**आर.सी.सी क्र. ७९०/२०२५**
**निशाणी क्र.५५/ क लगत.**

**<u>दिनांक १४.०१.२०२६ रोजी</u> – <u>सा.क्र.१ श्री. तेजस दिपक कुलकर्णी यांचा शपथेवर उलटतपास नि.क्र.१८५ व १८६ वरील आदेशानुसार आरोपी क्र.२ व ३ करिता विधीज्ञ श्री. के.डी. जाधव यांच्यातर्फे</u> –**

**आरोपी क्र.२ व ३ तर्फे विधीज्ञ श्री. के. डी. जाधव आरोपी क्र.१ तर्फे घेतलेला उलटतपास आहे तसा स्वीकारुन पुढील उलटतपास शपथेवर सुरु...**

---

रिट याचिका क्रमांक १७९/२०२४ मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल झाली त्यावेळी क्रिडा संकुल समितीमध्ये संजय सबनीस हे उपसंचालक म्हणुन कार्यरत होते त्यावेळी मी नव्हतो. दिनांक ३०.०९.२०२४ रोजी मी क्रिडा संकुल समितीमध्ये कार्यरत होतो. श्री. सबनीस यांनी मा. उच्च न्यायालयात झालेल्या आदेशानंतर मला फिर्याद दाखल करण्याचा आदेश दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, श्री. सबनीस हे माझे वरिष्ठ असल्यामुळे त्यांच्या आदेशाप्रमाणे मला कारवाई करणे आवश्यक होते. विभागीय क्रिडा समिती व क्रिडा व युवक कल्याण हे दोन वेगळे विभाग आहेत. तसेच या दोन्ही कार्यालयांचा कारभार देखील वेगळा चालतो. मी विभागीय क्रिडा संकुल समितीमध्ये कार्यरत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी विभागीय क्रिडा संकुल समितीमध्ये कार्यरत नसल्यामुळे तेथील घटनेविषयी मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी विभागीय क्रिडा संकुल समितीमध्ये कार्यरत नसल्यामुळे मला तेथील प्रत्येक व्यवहाराची व प्रत्यक्ष कारभाराची काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, विभागीय क्रिडा संकुल समितीमध्ये लेखा विभाग आहे. तेथे लेखा विभागात अकाऊंन्टंट पद आहे. हे म्हणणे खरे आहे की, बँकेचे कामकाज हे अकाऊंन्टंट पाहतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२ चे काम बँकेतुन रकमा काढणे व बँकेत रकमा भरणे याबाबत नव्हते. मी फिर्याद देतेवेळी अकाऊंन्टंटचे काम बँकेतुन रकमा काढणे व बँकेत भरणा करणे हे आहे असे कुठेही सांगितलेले नाही. मला आता नि.क्र.६६ फिर्याद जबाब दाखवला. यामध्ये अकाऊंन्टंटचे काम बँकेत पैसे भरणे अथवा बँकेतुन पैसे काढणे असे स्पष्टपणे नमुद नाही. हे मला माहिती नाही की, विभागीय क्रिडा संकुल समिती व विभागीय क्रिडा व युवक कल्याण या दोन्ही

विभागाचे दर तीन महिने, सहा महिने व बारा महिने असे लेखापरिक्षण केले जाते अथवा नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्येक कार्यालयाचा एक अधिकृत ईमेल आयडी असतो. हे म्हणणे खरे आहे की, तो ईमेल आयडी अधिकृतपणे वापरण्यासाठी प्रत्येक कार्यालयासाठी एक अधिकृत अधिकारी असतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२ हया अकाऊंटंन्ट नव्हत्या व त्या लिपिक होत्या. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.२ कडे अकाऊंन्टंट म्हणुन पदभार असल्याचा आमच्या कार्यालयाचा अधिकृत आदेश असल्याबाबत फिर्याद सोबत तसा कागद हजर केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.२ हया बँकेच्या संदर्भात कोणत्याही व्यवहार अधिकृत म्हणुन पाहत नव्हत्या. हे म्हणणे खरे आहे की, विभागीय क्रिडा संकुल समितीचे कामकाज हे आउटसोर्सींग मार्फत देखील चालत होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे विभागीय क्रिडा संकुल समितीचे काही कामकाज हे कंत्राटी कर्मचारी देखील पाहत होते. हे म्हणणे खरे आहे की, विभागीय क्रिडा संकुल समितीसाठी काही खरेदी असल्यास महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत पोर्टल महाटेंडर यावर जाहिरात प्रसिध्द केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, मी स्वतः कोणत्या ईमेलचा हॅशव्हॅल्यु बरोबर की चुकीचा हे ठरविण्या इतपत मी तांत्रिकरित्या सक्षम नाही. हे म्हणणे खरे आहे की, श्री. सबनीस हे बँकेचे अधिकृत व्यवहार पाहणारे अधिकारी होते. हे म्हणणे खरे आहे की, बँकेच्या व्यवहारासंबंधी लिपिकाला सहया करण्याचा अधिकार नव्हता.

हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२ यांनी कोणतेही बनावट पत्रे किंवा कोणतीही बनावट सही किंवा कोणत्याही प्रकारे नेटबँकीचा वापर करुन अथवा बनावट कागदपत्रे बनवुन बँकेतील रकमा हया कोणत्याही खात्यावर वळत्या केल्या नाहीत अथवा काढल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.२ यांनी विभागाच्या खात्यावरुन कोणतीही रक्कम त्यांच्या वैयक्तीक खात्यावर वळती केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.३ हे आरोपी क्र.२ चे पती असल्यामुळे त्यांना केवळ या प्रकरणात गोवण्यात आलेले आहे. हे मला माहिती नाही की, आरोपी क्र.२ व ३ हे सदन कुटूंबातील आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२ व ३ यांच्याकडुन गुन्हयात जी काही स्थावर व जंगम मालमत्ता जप्त करण्यात आली ती सर्व त्यांची स्वकष्टार्जीत मालमत्ता आहे. हे म्हणणे खरे

नाही की, सन २०२२ ते २०२४ पर्यंतचा लेखा परिक्षण विभागीय क्रिडा संकुल समितीचा झालेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.३ यांनी विभागाच्या कोणत्याही खात्यातील रक्कम त्यांच्या वैयक्तीक खात्यात वळती केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.३ हा विभागाचे कोणतेही पैशांचे व्यवहार पाहत नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.३ हा मुळातच विभागीय क्रिडा संकुल समितीमध्ये कार्यरतच नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, विभागातील वरिष्ठ अधिकार यांना वाचविण्यासाठी या प्रकरणात या आरोपींना गोवण्यात आलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिशा फॅसीलीटीज व वेव्ह मल्टी सर्वीसेस या कंत्राटी कर्मचारी पुरविणा–या कंपन्या व आमच्या खात्यातील वरिष्ठ व कर्मचारी हे संगनमत करुन खोटी केस दाखल करुन या आरोपींना गोवण्यात आलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२ व ३ यांच्या विरुध्द कोणताही पुरावा नसतांना, त्यांच्या विरुध्द कोणतेही खात्रीशीर माहिती नसतांना, मी फिर्याद नि.क्र.६६ मध्ये त्यांचे नाव नमुद केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.**

समक्ष

RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR
Digitally signed by RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR
Date: 2026.01.14 17:03:21 +0530

**( श्री. आर. एस. जांबोटकर )**
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद
**दिनांक – १४/०१/२०२६**

श्रवणोत्तर स्वीकृती.

RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR
Digitally signed by RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR
Date: 2026.01.14 17:03:29 +0530

**( श्री. आर. एस. जांबोटकर )**
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद